शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य क्रीडा पुरस्कार सुधारित नियमावलीमध्ये सुधारणा करण्यासाठी समिती नियुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : शिछपु २०१८/प्र.क्र.१२७/१८/क्रीयुसे २
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १ ऑगस्ट, २०१९.

<u>वाचा</u> :- १. शानि.सामाजिक न्याय, सां.का., क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.शिछपु.-२००२/प्र.क्र.७३/क्रीयुसे-२ दिनांक ९ जानेवारी, २००३
२. जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार शासन निर्णय क्र. शिछपु-२००४/ प्र.क्र.५२/क्रीयुसे-२, दिनांक १४.०९.२००४
३. शासन निर्णय, शा.शि.व क्री.वि. क्र.शिछपु-२००२/प्र.क्र.७३/क्रीयुसे २, दिनांक १९.१०.२००६
४. शासन निर्णय, शा.शि.व क्री.वि. क्र.शिछपु-२०११//प्र.क्र.१९८/२०११/क्रीयुसे २, दिनांक ०१.१०.२०१२
५. शासन निर्णय, शा.शि.व क्री.वि. क्र. राक्रीधो २०१२/प्र. क्र. १५८/क्रीयुसे २, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७
६. शासन निर्णय, शा.शि.व क्री.वि. क्र. शिछपु २०१८/प्र. क्र. १२७/क्रीयुसे २, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८
७. शासन निर्णय, शा.शि.व क्री.वि. क्र. शिछपु २०१६/प्र. क्र. २०१/क्रीयुसे २, दिनांक १२ डिसेंबर, २०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्यातील नामवंत सर्वोत्कृष्ट क्रीडापटू, क्रीडा कार्यकर्ते तसेच महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी अहर्निश व सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या खेळाडू/व्यक्तींना दरवर्षी शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य साहसी क्रीडा पुरस्कार, एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व उत्कृष्ट क्रीडा संघटक/कार्यकर्ते व जिजामाता पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कारांच्या सुधारित नियमावलीस उपरोक्त दि. १६.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार व अन्य क्रीडा पुरस्कारासाठी नियमावली तयार करुन निकष निश्चित करण्यात आलेले आहे. सदर नियमावलीत दि.०८.१२.२०१७ व दि. २४.१०.२०१८ च्या शुध्दीपत्रकान्वये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. प्रचलित नियमावलीमध्ये तसेच निकषांमध्ये आणखी बदल करणे आवश्यक आहे. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारांसदर्भात दि.१६.१०.२०१७ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा

करण्याकरिता समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य साहसी क्रीडा पुरस्कार, एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व उत्कृष्ट क्रीडा संघटक/कार्यकर्ते व जिजामाता पुरस्कार वितरणाच्या अनुषंगाने दि. १६.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या निकषांचा अभ्यास करुन निकष/नियमांमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी खालील समितीचे गठन करण्यात येत आहे.

२. सदर समितीने उपरोक्त शासन निर्णयान्वये विहित केलेल्या निकषांचा / नियमांचा अभ्यास करुन त्यात करावयाच्या सुधारणांसदर्भातला समितीचा अहवाल १ महिन्यात शासनास सादर करावा. समितीचा कालावधी दोन महिने राहिल.

समितीची रचना :

अ.क्र.	सदस्यांचे नावे	पदनाम
१.	श्री. धनराज पिल्ले, पद्मश्री पुरस्कारार्थी	अध्यक्ष
२.	श्री. उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई	कार्याध्यक्ष
३.	सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.	सदस्य
४.	श्री. सुधीर मोरे, उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे	सदस्य
५.	श्री. एन. बी. मोटे, उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई	सदस्य
६.	श्री. रविंद्र नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी	सदस्य
७.	श्री. दिलीप वेंगसकर, अर्जुन पुरस्कारार्थी	सदस्य
८.	श्रीमती तेजस्विनी सावंत, अर्जुन पुरस्कारार्थी	सदस्य
९.	श्री. अरुण खोडसकर, योगा, अमरावती	सदस्य
१०.	श्री. प्रदिप गंधे, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन	सदस्य
११.	श्रीमती वर्षा उपाध्ये, जिमनॅस्टिक	सदस्य
१२.	श्री. ऋषिकेश यादव, सहासी क्रीडा प्रकार	सदस्य
१३.	श्री. राजाराम घाग, पॅरा ऑलिंम्पिक	सदस्य
१४.	श्री. श्रीकांत वाड, बॅडमिंटन	सदस्य
१५.	श्री. मनोहर साळवी, विशेष निमंत्रित	सदस्य
१६.	श्री. सुहास पाटील, सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा	सदस्य सचिव

३. उपरोक्त समितीच्या अशासकीय सदस्यांना शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक २४.५.२०१२ नुसार बैठक भत्ता तसेच शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ०३.०३.२०१० च्या परिच्छेद १२ मधील तरतूदीनुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. प्रवासभत्ता/दैनिक भत्ता व बैठकीच्या आयोजनावर होणारा खर्च हा शिवछत्रपती क्रीडापीठ, बालेवाडी, पुणे यांचेकडे जमा निधीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०११४५९५१३१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.08.01 15:07:22 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
४. सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६. सर्व संबंधित अशासकीय सदस्य (संचालनालयामार्फत)
७. मा. मंत्री (क्रीडा व युवक सेवा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
९. निवड नस्ती, क्रीयुसे-२